# कठुआच्या निमित्ताने....

"सुनो द्रौपदी शस्त्र उठालो अब गोविंद ना आयेंगे.." कठुआ आणि उनाव येथील लहान मुलींवरील बलात्काराने संपूर्ण देश ढवळला असतानाच आणि माध्यमांवरील बिनधास्त आणि बेधडक चर्चांना उधाण आलेले असतानाच व्हाट्स अपवर ही कविता आली आणि मनात विचार आला खरोखर द्रौपदीने शस्त्र हातात धरून प्रश्न सुटणार आहे का?

सध्या सर्व मीडियावर सगळेच जण निरनिराळ्या प्रकारे व्यक्त होत आहेत. कुणाला यात हिंदूविरोधी कट दिसतोय तर कुणाला मुस्लिमांबद्दल सहानुभूती! पण अशा घटना का होतात आणि त्या थांबवण्यासाठी केलेले उपाय पुरेसे आहेत का व नसतील तर काय करायला हवे यावर विचारमंथन होताना दिसत नाही. तात्काळ अशा गुन्हेगारांना फाशीची शिक्षा द्यावी आणि दावा जलदगती न्यायालयाकडे द्यावी ईतक्याच मागण्या करून आपली जबाबदारीही संपत नाही.

"न्यायाला उशीर म्हणजेच न्यायाला नकार" (justice delayed is justice denied) हे आपण सर्वच जाणतो आणि लवकरात लवकर आणि योग्य न्याय हे कुठल्याही न्यायप्रणालीचे मूलभूत तत्व आहे. पण दुर्दैवाने आपल्या देशात "तारीख पे तारीख" हीच परिस्थिति आहे. त्याच्या कारणांच्या खोलात आपण आत्ता नको जाऊ या. त्यामुळेच बलात्काराचे किंवा असे ईतर संवेदनशील दावे "जलदगती न्यायालयांकडे" सुपूर्द करून लवकर न्याय मिळण्यासाठी आपल्या देशातही प्रयत्न केले जातात आणि अशी अनेक जलदगती न्यायालये आपल्या ईथे निर्माण केली आहेत. पण शेवटी "जलद" हा शब्द सापेक्ष आहे कारण दावे जलदगती न्यायालयांकडे गेले तरी बाकीची न्यायप्रणाली, नियम, पद्धती या पूर्वीच्याच आहेत आणि ते राबवणारी माणसेही पूर्वीच्याच मनोवृत्तीची आहेत त्यामुळे तिथेही प्रकरणे प्रलंबित आहेत. अर्थातच ईतर न्यायालयांच्या तुलनेत जलदगती न्यायालयात लवकर निर्णय लागतात ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही. त्यामुळे अधिक जलदगती न्यायालयांनीची निर्मिती, त्यांना लागणाऱ्या सोयी सुविधांचा पुरवठा याचबरोबर त्वरित न्याय मिळण्याच्या दृष्टीने काही बदल कायद्यातही अपेक्षित आहेत. उनाव आणि कठुआ येथील दोन्ही घटना पोक्सो कायद्याखाली येतात कारण पीडित मुली १८ वर्षाखालील आहेत. या कायद्यांतर्गत विशेष न्यायालयाची तरतूद असून अश्या केसेस ह्या विशेष न्यायालयासमोरच चालवल्या जातात.

ह्यात महत्वाचा प्रश्न आहे तो किती प्रकरणात आरोपींना शिक्षा होते आणि आरोपी सुटत असल्यास त्याची कारणे कोणती?

कोणतीही बलात्काराची घटना घडल्यानंतर पोलिसांची भूमिका महत्वाची ठरते. बलात्काराच्या बऱ्याच प्रकरणात पोलिस “प्रथम खबरी अहवाल” नोन्दवण्यासच टाळाटाळ करतात. अश्या घटनेत पीडित व्यक्तीची वैद्यकीय तपासणी आणि तिला वैद्यकीय मदत देणे अतिशय महत्वाचे असते पण बऱ्याच वेळा पोलिस पीडितेची वैद्यकीय तपासणीच वेळेत करत नाहीत त्यामुळे पुरावा नष्ट होण्याची भीती निर्माण होते तसेच तिला लगेच वैद्यकीय मदत न मिळाल्यास तिच्या जीवाला धोकाही निर्माण होऊ शकतो. सर्वोच्च न्यायालयाच्या “मथुरा” केसमधील निर्देशांनुसार पीडितेला पोलिस ठाण्यातच मोफत कायदेशीर सल्ला व मदत मिळणे आवश्यक आहे. पोलिस ठाण्यात मोफत कायदेशीर सल्ला देणाऱ्या वकिलांची नावेही उपलब्ध असायला हवीत. पण हे कधीच घडत नाही. तसेच पीडितेला तात्काळ वैद्यकीय मदत, समुपदेशन, मोफत कायदेशीर सल्ला आणि नुकसान भरपाई मिळणे हे सगळ्यात महत्वाचे पण यातील बऱ्याच किंवा कधी कधी सर्वच गोष्टींपासून पीडित व्यक्ति वंचित राहते.

बलात्काराची घटना जर अल्पवयीन व्यक्तीच्या बाबतीत घडली असेल तर तो दावा पोक्सो कायद्यांतर्गत (बाल लैंगिक शोषण विरोधी कायदा) येतो. त्या कायद्यांतर्गत तरतुदींनुसार पीडित व्यक्तितर्फे दाखल केलेल्या प्रथम खबरी अहवालाची (एफ.आय. आर.) प्रत बालकल्याण समितीसमोर सादर करणे ज्यामुळे बाल कल्याण समिति बालकाच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक ते आदेश देऊ शकेल , तिचा जबाब नोंदवताना पोलिसांनी साध्या कपड्यात जाणे, पीडित व्यकीला जिच्या सानिध्यात सुरक्षित वाटते अशा व्यक्तीच्या उपस्थितीत तिचा जबाब स्त्री पोलिस अधिकाऱ्याने नोंदवणे, जबाब दंडाधिकाऱ्यांसामोर नोंदवणे ज्यामुळे पीडितेला वारंवार त्या घटनेचे वर्णन सांगावे लागणार नाही अशा अनेक बाबींचा समावेश आहे. पण बहुतांशी पोलिसांना ह्या विशेष कायद्यांचे, त्यातील तरतुदींचे प्रशिक्षणच दिले जात नाही. त्यामुळे त्यांच्यामध्ये अपेक्षित संवेदनशीलता आढळत नाही. याबरोबरच भ्रष्टाचार, वरिष्ठांकडून आणि राजकीय, सामाजिक, धार्मिक दबाव याच्यामुळेही पोलिसांकडून तपासात अनेक त्रुटी ठेवल्या जातात वा राहून जातात आणि दुर्दैवाने त्याचा फायदा आरोपींना मिळतो. साक्षीदारांची सुरक्षितता हा दूसरा महत्वाचा मुद्दा! साक्षीदार उलटतात आणि केस कमकुवत होते. उनाव प्रकरणात पिडीत मुलीच्या वडिलांना झालेली बेदम मारहाण आणि त्यात झालेला त्यांचा मृत्यू पोलिसांची निष्क्रियता, त्यांच्यावर असणारा प्रचंड राजकीय दबाव याचेच निर्देशक आहे. अनेक पोलिस ठाण्यात स्त्री पोलिस अधिकाऱ्यांची उपलब्धता नसणे व त्यामुळे पीडितेचा जबाब पुरुष अधिकाऱ्याने नोंदवणे हे पोक्सो कायद्याच्या तरतुदींच्या विरोधात ठरते. त्यामुळे योग्य तऱ्हेने साक्षी पुरावे गोळा करणे व न्यायलायात सादर करणे हे घडत नाही आणि शिक्षेचे प्रमाण घटते. कित्येक वेळा पीडित स्त्रीला वारंवार साक्षीसाठी/जबाबासाठी पोलिस ठाण्यात बोलावून दिवसभर बसवून ठेवले जाते आणि तिचे मानसिक खच्चीकरण होते व ती जर सज्ञान असेल तर “तुझ्याशी

कोण लग्न करणार त्यापेक्षा केस मागे घे ईथपासून ते बलात्कार करणाऱ्याशीच लग्न कर ईथपर्यन्त सल्ले दिले जातात. त्यामुळे सर्वात महत्वाचा दुवा असणाऱ्या पोलिसांचे सतत प्रशिक्षण आणि त्यांच्या संवेदनशीलता निर्माण करणे हे प्रकर्षाने व्हायला हवे. दूसरा महत्वाचा मुद्दा म्हणजे बलात्काराच्या दाव्यामद्धे वैद्यकीय तपासणी व त्याचा अहवाल अत्यंत महत्वाचा साक्षी पुरावा असतो. पण बऱ्याच वेळा डॉक्टराना याचे ज्ञान नसते. एम.बी.बी.एस.च्या अभ्यासक्रमात १०-१५ मार्कांसाठी केलेली तयारी पुरवयाच्या दृष्टीने अहवाल बनवताना उपयोगी पडत नाही. मुंबईत "सेहत" या गैरसरकारी संस्थेने सरकारी ईस्पितळातील डॉक्टरांसाठी "सेफ किट" या नावाने तयार केलेले मोडेल तीन ईस्पितळात वापरले जाई व त्याची उपयुक्तता पटल्यानंतर आता मुंबई महापालिकेने बहुतेक सर्व ईस्पितळात ते वापरायला सुरवात केली आहे. हे मोडेल पीडित स्त्रीला तिचा दावा वैद्यकीय पुराव्यांच्या आधारे सिद्ध करण्यास मदत करेल अशा पद्धतीने तपासणी अहवाल बनवण्यासाठी मदत करतेच पण त्याचबरोबर पीडितेच्या बलात्कारानंतर होणाऱ्या संभाव्य परिणामांचा विचार करून एकूण आरोग्याच्या दृष्टीने आवश्यक ती वैद्यकीय मदत देते जे पूर्वी घडत नसे. याच धर्तीवर राज्यातील सर्व वैद्यकीय अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण, पुराव्याच्या दृष्टीने योग्य तपासणी अहवाल बनवण्याचे प्रशिक्षण, पीडितेला कोणती मदत देणे गरजेचे आहे याचे शिक्षण व त्यासाठी समुपदेशन यांचीही खूपच गरज आहे.

आपल्या देशात आरोपींसकट सर्वांना अधिकार आहेत. पण दुर्दैवाने पीडित व्यक्तीचे न्याय मिळवण्याचे अधिकार फारच मर्यादित आहेत. सर्व फौजदारी गुन्ह्यात (ज्यात बलात्काराच्या गुन्ह्यांचाही समावेश आहे) दावा राज्याकडून दाखल होते आणि पीडित व्यक्ति साक्षीदार बनते. तिला स्वत:च्या मदतीसाठी वकील नेमता येत असला तरी तिची वकील फक्त सरकारी वकिलांना मदत करणे व एकंदर केसवर नजर ठेवणे ईतकेच काम करू शकते. परिणामी पीडित स्त्रीचा अश्या दाव्यावर काहीच ताबा राहत नाही. सरकारी वकील ईतर दाव्याप्रमाणेच हा एक दावा ईतकेच महत्व सामान्यत: देतात. साक्षीदारांची पूर्व तयारी, पुराव्यांचा अभ्यास याबाबतीत सरकारी वकीलांची तयारी आणि आरोपींनी बऱ्याच वेळा उभे केलेल्या निष्णात फौजदारी वकिलांची तयारी ह्यात जमीन अस्मानाचा फरक पडतो. बऱ्याच वेळा दबावामुळे, आर्थिक व्यवहारांमुळे सरकारी वकिलांकडून केसमध्ये हिरीरीने पीडितेची बाजू मांडली जात नाही आणि आरोपी निर्दोष सुटतो. नुकतीच सरकारी वकिलांना त्यांच्या कामाचे पैसे सरकारकडून मिळत नसल्याने कोर्टात दावा दाखल केल्याची बातमी पुरेशी बोलकी आहे. त्यामुळे पीडित व्यक्तिला काही कायदेशीर अधिकार मिळण्याची, केवळ साक्षीदार न राहता वकिलातर्फे बाजू मांडण्याची, युक्तिवाद करण्याची संधि मिळण्यासाठी कायद्यात बदल करणे गरजेचे आही.

शेवटी निर्भया, शक्ति मिल कंपाऊंड, कठुआ, उनाव, सूरत आणि अश्या अनेक घटनांची मालिका थांबवायची असेल तर तात्पुरती मलमपट्टी उपयोगाची नाही

गरज आहे ती कायद्यातील तरतुदींपासून पोलिस, सामाजिक मानसिकता यात बदल करण्याची आणि आरोपींना लवकरात लवकर योग्य शिक्षा करून ती अमलात आणून कायद्याचा धाक निर्माण करण्याची !

... नयना परदेशी

nayana194@gmail.com